## प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय, नागपूर

## स्थायी आदेश क्रमांक :- ००१

## संरक्षित क्षेत्राबाहेरील वन्यजीवांच्या संरक्षणाबाबत उपाययोजना

### प्रस्तावना

महाराष्ट्र राज्याचे भौगोलीक क्षेत्र ३०७ लक्ष हेक्टर आहे. त्यापैकी वनक्षेत्र ६३ लक्ष हेक्टर आहे. हे वनक्षेत्र वन आणि महसूल विभाग यांच्या ताब्यात अनुक्रमे ५५ लक्ष व ८ लक्ष हेक्टर आहे. या वनामध्ये आणि वनाबाहेर वेगवेगळया वन्यप्राणी प्रजातींचा निवास आहे. वनांचा -हास होत असल्यामूळे वन्यप्राण्यांच्या निवास व संरक्षणाचा मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे. तसेच समाजातील काही लोक वन्यप्राण्यांची शिकार करून त्याचे मांस, कातडी, शिंगे इत्यादी वस्तंची अवैध तस्करी / व्यापार करीत आहेत. या सर्व बाबीवर मात करण्यासाठी अभयारण्ये व राष्ट्रीय उद्यानांची निर्मिती करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये एकूण ६ राष्ट्रीय उद्याने व ३५ अभयारण्ये असून त्यामध्ये ३ व्याघ्र प्रकल्पांचा समावेश आहे. यादी परिशिष्ठ १ मध्ये दिली आहे. अशा त-हेने निर्मित संरक्षित क्षेत्राचे क्षेत्रफळ ७ लक्ष हेक्टर इतके आहे. या शिवाय ८ लक्ष हेक्टर क्षेत्रावर माळढोक पक्षी अभयारण्य आहे. वन खात्यामध्ये वन्यजीव व्यवस्थापनासाठी वेगळा वन्यजीव विभाग कार्यरत आहे. सन २००१ मध्ये राज्यस्तरीय प्रगणनेत असे निदर्शनास आले आहे की, संरक्षित क्षेत्राबाहेरील वन्यप्राण्यांच्या, विशेषतः वाघ या सर्वात महत्वाच्या वन्यप्राण्याच्या संख्येत वर्षानुवर्ष नियमीतपणे घट होत चालली असून जर याबाबत योग्य उपाययोजना केली गेली नाही तर या क्षेत्रातील वाघ आणि त्याच्यासोबत इतर वन्यप्राणी लुप्तप्राय होतील व त्याचा दुष्परिणाम निश्चितच पर्यावरणावर होवुन त्यामुळे वनांची प्रत व वनसंवर्धनाचीही मोठया प्रमाणावर हानी होण्याची शक्यता आहे.

अशा क्षेत्रात वन्यजीवांची संख्या कमी होण्याचे मुख्य कारण म्हणजे या भागांत वन्यजीवांचे संरक्षण तसेच त्यांचे आश्रयस्थळ व परिसराच्या योग्य संवर्धनासाठी पुरेशी उपाययोजना व प्रयत्नांची कमतरता हे होय. संरक्षित क्षेत्रात ज्या पध्दतीने वन्यजीवांसाठी आश्रयस्थळ व पाणस्थळांचा विकास तसेच त्यांच्या संरक्षणासाठी उपाययोजना केल्या जातात, त्या पध्दतीची कार्यवाही या क्षेत्राबाहेर केली जात नाही. संरक्षीत क्षेत्राबाहेर वन्यजीवांना अवैध शिकारी, अधिवास क्षेत्राचा -हास (Habitat Destruction) चारा व पाण्याची कमतरता यासारख्या

मोठया अडचणींना तोंड द्यावे लागत असल्यामूळे याचा भयंकर परिणाम त्यांच्या प्रजनन व संवर्धनावरही होतो. अवैध शिकार वा अपुरे प्रजनन याचा दुष्परिणाम म्हणून त्यांची संख्या **भयावह वेगाने रोडावत आहे.** अशा परिस्थितीत वने व वन्यजीवांचे संरक्षण तसेच पर्यावरणाचा समतोल राखण्याचे दृष्टीने तात्काळ उपाययोजना करणे आवश्यक आहे. यापुढे या कामासाठी संरक्षीत क्षेत्रात नेमलेले सर्व मुख्य वनसंरक्षक, वनसंरक्षक, उपवनसंरक्षक व सहाय्यक वनसंरक्षक वन्यप्राण्यांना संरक्षीत क्षेत्राबाहेर संरक्षण देण्यासाठी प्रादेशिक कामावर नेमण्यात आलेले अधिकारी व कर्मचारी यांना वन्यप्राणी व त्यांचे अधिवास वाचविण्यासाठी उद्युक्त करतील व तांत्रीक दृष्टीकोनातुन वेळोवेळी मार्गदर्शन व सहाय्यता करतील.

अन्न साखळीमध्ये वाघ हो सर्वोच्च स्थानी असून सुरक्षित व स्वस्थ पर्यावरणाचा तो प्रतिक आहे म्हणून जगात जीवन कायम ठेवण्यासाठी त्याला संरक्षण देणे अत्यंत आवश्यक आहे. सन २००१ च्या राष्ट्रीय वन्यप्राणी प्रगणणेमध्ये महाराष्ट्र राज्यात एकूण २३८ वाघ आढळले. मागील ८ ते १० वर्षापासून संरक्षित क्षेत्रातील वाघांची संख्या स्थिर आहे. परंतू संरक्षित क्षेत्राबाहेरील वनक्षेत्रातील वाघांच्या संरक्षणावर विशेष लक्ष देणे गरजेचे असल्याचे आढळून आले आहे.

संरक्षित क्षेत्राबाहेरील इतर क्षेत्रात वन विभाग, सामाजिक वनीकरण विभाग व वन विकास महामंडळ यामध्ये वनसंवर्धनासाठी जे अधिकारी / कर्मचारी कार्यरत आहेत, ते वन्यजीवांच्या संरक्षण व संवर्धनाबाबत विशेष लक्ष पुरवू शकत नाहीत. या बाबत तत्कालीन मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) म.रा.नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष २३ (६)/१९०,दिनांक २५-४-२००१ नूसार योग्य सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्याची प्रत सोबत जोडण्यात येत आहे. (परिशिष्ट-२) तसेच शासन पत्र क्रमांक कक्ष-२२ (ड)(१)/प्र.क्र.११७/११८० दिनांक २३ सप्तेंबर, १९९३ अन्वये वन्यजीवांचे संरक्षण व शिकार प्रतिबंधक उपाययोजना करण्यासाठी वनधिका-यांना अधिकार प्रदान केले आहे. तसेच जेथे जेथे रानडुकरांच्या संख्येमध्ये जास्त वाढ झालेली आहे व पिक नुकसानी करिता आहे, तेथे त्याचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांचे पत्र क्रमांक कक्ष -२३ (३)/२८९९ दिनांक २५-१/२००२ अन्वये करावयाच्या उपाययोजनांबाबत सुचना जारी करण्यात आल्या आहेत. वन्यजीवांसाठी संरक्षित केलेल्या क्षेत्रा बाहेर, वन किंवा वनांबाहेर प्रत्येक ठिकाणी वेगवेगळया प्रकारचे वन्यप्राणी आढळतात. **संरक्षीत क्षेत्राबाहेरील**

**वन्यजीवांचे संवर्धन व प्रभावी संरक्षणासाठी खालील प्रमाणे स्थायी आदेश त्वरीत अंमल बजावणीसाठी देण्यात येत आहेत.**

**१.०० <u>वन्यजीव संरक्षण व गुप्तवार्ता प्राप्तीसाठी माहिती जाळे उभारणे :-</u>**

वन्यजीव विषयक गुन्हायांना प्रतिबंध घालणे आणि गुन्हाशोधन करुन गुन्हेगारांवर वचक ठेवण्यासाठी वनधिका-यांनी आपआपल्यास्तरावर गुप्त माहिती जाळे निर्माण करणे अत्यंत आवश्यक आहे. स्थानिक लोक, वनमजूर व वनरक्षक यांना परिसरातील बारीकसारीक घडामोडींची बरीच माहिती असते. वरिष्ठ अधिका-यांनी स्थानिक कर्मचारी व लोकांशी मिसळून त्यांचेकडून महत्वाची माहिती प्राप्त करावी. अशा प्रकारे मिळालेल्या पूर्व सुचनेनुसार संभाव्य गुन्हयांवर नियंत्रण ठेवता येईल. तसेच गुप्त माहिती मिळवून वन्यजीव विषयक अवैध शिकार व व्यापार प्रतिबंधात्मक चांगले कार्य केल्याबद्दल वन अधिकारी व कर्मचा-यांना प्रोत्याहन देण्यात यावे व उत्कृष्ठ कामांची नोंद त्यांच्या सेंवापुस्तिकेत घेण्यात यावी.

प्रादेशिक वन अधिका-यांनी त्यांच्या अखत्यारितील क्षेत्रात, वन्यजीवांचे संरक्षण व अवैध शिकार प्रतिबंधक उपाययोजना अंमलात आणणेसाठी खालील सूचना देण्यात येत आहेत.

१.०१ वन्यप्राण्यांच्या संवर्धन व संरक्षणाच्या संदर्भात वनरक्षकापासूपन वरिष्ठ सर्व कर्मचारी व अधिकारी त्यांच्या दैनंदिन कर्तव्यात नेहमीच दक्ष राहतील.

१.०२ वन्यप्राण्यंच्या संवर्धन व संरक्षणाबाबत सर्वस्तरावरील कर्मचारी व अधिकारी आवश्यक उपाययोजना करतील. सर्व संभाव्य व अस्तित्वात असलेले वन्यजीव परिसराचे संवर्धन व विकासाची तसेच संरक्षणाची जबाबदारी लक्षांत घेवून उपवनसंरक्षक (संबंधित) वार्षिक आराखडा तयार करतील व अर्थसंकल्पात त्याचा समावेश करतील तसेच अवैध शिकारी संबंधी व घडलेल्या कुठल्याही घटनांची माहिती वरिष्ठांना त्वरीत कळवतील.

१.०३ वरीलप्रमाणे करावयाच्या उपाययोजनेत खालील बाबींचा समावेश असावा.

अ) **<u>वनरक्षकांची कर्तव्ये आणि उपाययोजना:-</u>** वन्यजीव संरक्षणाच्या संदर्भात वनरंक्षक हा एक प्रमुख घटक असून सर्व गुन्हयांची वन्यजीवविषयक प्राथमिक माहिती त्यांच्याकडून प्राप्त करुन वेळीच वन गुन्हयावर नियंत्रण सुध्दा करता येवू शकेल. याबाबत खालीलप्रमाणे वनरक्षकांनी कृती करणे आवश्यक आहे.

१) वनरक्षकांनी त्यांच्या अधिनस्त सर्व वनक्षेत्राची व सर्व पाणस्थळांची माहिती त्यांच्या क्षेत्रामध्ये फिरून प्राप्त करावी.

२) त्याच्या बिटामध्ये आढळणा-या सर्व प्रमुख वन्यप्राण्याची माहिती करून घ्यावी व कुठल्या क्षेत्रामध्ये कोणते प्राणी जास्त प्रमाणावर आहेत याचा नियमित आढावा स्वत: फिरून व स्थानिक लोकांकडून घ्यावा.

३) वन्यजीव विषयक अपराधाचा इतिहास असणा-या संशयित गुन्हेगारांची माहिती ठेवावी तसेच त्यांच्या हालचालीवर सुध्दा बारीक लक्ष ठेवावे.

**४)** वनक्षेत्रामधून जात असलेल्या विद्यूत वाहिन्यांजवळ, अवैध विद्यूत प्रवाहाने वन्यप्राण्यांच्या हत्या (Electrocution) अलीकडे मोठया प्रमाणावर होवू लागल्याने वनरक्षकांनी आपल्या क्षेत्रातील सर्व विद्यूत वाहिन्या जात असलेल्या क्षेत्रांची नियमित तपासणी करावी. जणेकरून विद्यूतद्वारे हत्यांच्या प्रयत्नांवर आळा घालता येईल. **रात्रीच्या वेळेस गस्त करीत असतांना अशा क्षेत्राची माहिती वनरक्षकांच्या स्वतःच्या सुरक्षिततेसाठी सुध्दा उपयूक्त ठरेल.**

ब) **वनपालांची कर्तव्ये आणि उपाययोजना :-**

१) वनरक्षकाकडून अपेक्षित वरील सर्व कामे नियमित होत आहेत याकडे वनपालांनी लक्ष पुरविणे हे त्यांचे आद्य कर्तव्य राहील.

२) वनपालांनी आपल्या उपक्षेत्रातील सर्व पाणस्थळे व मुख्यत्वे करून पाणीटंचाईच्या काळामध्ये पाणी उपलब्ध असलेल्या स्थळांची माहिती ठेवावी व हि माहिती आपल्या उपक्षेत्राच्या नकाशावर दर्शवावी.

३) पाणी उपलब्ध असलेल्या पाणस्थळांची टंचाईच्या काळात अधिक तिव्रतेने नियमित तपासणी करावी व त्यामध्ये विष किंवा युरिया टाकले जाणार नाही या दृष्टीकोनातून सतर्क राहावे.

४) वनपालांनी आपल्या अधिनस्त वनरक्षक व त्यांचे सहाय्यक यांचे सोबत नियमित रात्रीची गस्त करावी.

५) वन्यप्राण्यांकडून पाळीव जनावरे ठार होणे अथवा मनुष्य जिवीतास हानी होणा-या घटनांची ताबडतोब दखल घेवून प्राथमिक चौकशी करावी व १२ तासाचे आंत वरिष्ठांना अहवाल सादर करावा.

६) मृत झालेल्या पाळीव जनावराच्या प्रकरणात विषप्रयोगाद्वारे वन्यप्राण्यांची हत्या होणार नाही याबाबत काळजी घ्यावी.

७) आपले अधिनस्त क्षेत्रातील बंदुक किंवा इतर तत्सम शस्त्रधारींची माहिती ठेवावी.

क) **<u>वनपरिक्षेत्र अधिकारी यांची कर्तव्ये आणि उपाययोजना:-</u>**

१) वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी आपल्या अधिनस्त वनपाल / वनरक्षकांच्या कामाचा नियमित आढावा घ्यावा.

२) उपरोक्त प्राप्त माहितीच्या आधारे त्यांनी संवेदनशिल क्षेत्राची माहिती वनपरिक्षेत्राच्या नकाशावर दर्शवावी. यामध्ये विद्युत वाहिन्यांचे अस्तित्व, पाणस्थळे, वन्यप्राणी आढळ क्षेत्र, शस्त्रधारक व्यक्तींची गावे इत्यादी माहिती दर्शविण्यात यावी.

३) संवेदनशिल क्षेत्रात वनपाल / वनरक्षकांकडून नियमित गस्त होत असल्याची खात्री करावी व त्यांचेकडून खैरियत अहवाल प्राप्त करावा. या अहवालात वन्यप्राणी मुख्यत: वाघ व बिबट या प्राण्यांचा कुठल्या क्षेत्रामध्ये वावर आहे, या माहितीचाही अंतर्भाव असावा.

४) वनपरिखेत्र अधिकारी यांनी नियमितपणे आपल्या परिक्षेत्रातील बिट मुख्यालयांस भेट देवून व काही प्रसंगी रात्रीचा मुक्काम करुन वनमजूर व स्थानिक लाकांशी संपर्क ठेवावा व गुप्त माहिती देणा-यांचे जाळे तयार करावे.

५) वन्यप्राण्यांकडून हत्या झालेल्या पाळीव प्राण्यांच्या प्रकरणांमध्ये देण्यात येणारी नुकसान भरपाई संबंधितास मिळण्यासाठी प्रकरणांचा निपटारा तात्काळ करावा.

६) ग्रामीन भागामध्ये वन्यप्राणी व पक्षी किंवा त्याच्या मांसाची विक्रि विशेंषत: आठवडी बाजारात होवू नये याबाबत वनपरिक्षेत्र अधिका-यांनी खातरजमा करावी व तशा प्रकारचे नियमित अहवाल त्यांनी आपल्या क्षेत्रासाठी मागवावे.

७) तेंदू हंगामामध्ये तेंदूपाने गोळा करण्याकरिता मजूर संरक्षित क्षेत्रात जातात असे निदर्शनास आलेले आहे, त्या दृष्टिकोनातून आदेशीत करण्यात येते की, राष्ट्रीय

उद्यान/ अभयारण्यापासून ३ कि.मी. च्या आत तेंदूपाने किंवा गौण वनउपज संकलन करणा-या परवानाधारकावर कायदेशीर कारवाई करावी.

ड) **<u>सहाय्यक वनसंरक्षकांची कर्तव्ये उपाययोजना:</u>**

१) सहाय्यक वनसंरक्षक यांनी वन्यप्राणी संरक्षणासंदर्भात आपल्या अधिनस्त वनरक्षक / वनपाल /वनपरिक्षेत्र अधिकारी यांचेकडून नियमित आढावा घ्यावा. सर्व अधिनस्त कर्मचा-यांना विहीत केलेली कामे ते काटेकोरपणे करीत आहेत याबाबत त्यांनी वेळीअवेळी, अचानकपणे दौरा करून खात्री करावी.

२) आपल्या अधिनस्त संवेदनशील क्षेत्रात स्थानिक कर्मचा-यांसोबत नियमित गस्त करावी व संशयित गुन्हेगारांच्या हालचालीबाबतचा आढावा कर्मचारी व स्थानिक ग्रामस्थ / पदाधिकारी यांचेकडून घ्यावा.

३) सहाय्यक वनसंरक्षक यांनी आग प्रतिबंधक उपाययोजना व्यवस्थित राबविल्या जात आहेत याची खात्री करावी.

४) वन्यजीव विषयक गुन्हे प्रकरणांत चौकशी करण्याचे अधिकारी सहाय्यक वनसंरक्षक यांनाच असल्याने त्यांनी चौकशीमध्ये विशेष लक्ष घालून त्रुटी विरहीत दोषारोपपत्र न्यायप्रविष्ठ केले जाईल याकडे लक्ष द्यावे. सर्व न्यायालयीन प्रकरणांचा नियामित आढावा मुख्य वनसंरक्षक, वनसंरक्षक / उपवनसंरक्षक यांना सादर करावा. प्रकरणातील साक्षीदार तारखेला उपस्थित राहतील याकडे सुध्दा लक्ष द्यावे. साक्षीदार तारखेला उपस्थित राहत नसतील तर सदर बाब न्यायालयाच्या निदर्शनास आणुन आवश्यक कार्यवाही करावी.

१.०४ शासन आदेश क्रमांक कक्ष -२२(ड)(१)प्र.क्र.११७/११८० दिनांक २३ सप्तेंबर, १९९३ अन्वये वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ अंतर्गत वनअधिका-यांना काही तरतुदींचे अधिकार प्रदान केलेले असून त्याची प्रत सोबत सहपत्रित करण्यात येत आहे.(परिशिष्ट-३) त्यामधील काही प्रमुख कलमे व प्रदान केलेले अधिकारी पुढील प्रमाणे आहे.

| क्र. | कलम | अधिकारी मर्यादा | प्राधिकृत अधिकारी |
|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** |
| १ | ११(१)(ब) | मानवी जिवितास अथवा मालमत्तेस हानीकारक ठरणा-या अनुसूची -१ व्यतिरिक्त इतर वन्यप्राण्यांस ठार करण्याचे अधिकार | अतिरिक्त मुख्य वन्यजीव रक्षक / उपमुख्य वन्यजीव रक्षक |
| २ | ३९(२) | वन्यजीव जी शसकीय मालमत्ता आहे त्या बाबत अहवाल प्राप्त करणे किंवा ताब्यात घेण्याचे अधिकार | अतिरिक्त मुख्य वन्यजीव रक्षक / उपमुख्य वन्यजीव रक्षक /वन्यजीव रक्षक / सहाय्यक वन्यजीव रक्षक |
| ३ | ४०(१) | अनु-१ आणि अनु-२ च्या भाग-२ मधील बंदीस्त वन्यप्राणी ताब्यात असल्याबाबतचे अधिकथन स्विकारण्याचे किंवा असे वन्यजीव ताब्यात घेण्याचे अधिकार | अतिरिक्त मुख्य वन्यजीव रक्षक / उपमुख्य वन्यजीव रक्षक |
| ४ | ४१(१) | मृगया चिन्हांची चौकशी करणे, जंत्री तयार करणे व त्यावर ओळखचिन्हे लावण्यासाठी वास्तूत प्रवेश करण्याचे अधिकार | अतिरिक्त मुख्य वन्यजीव रक्षक/उपमुख्य वन्यजीव रक्षक /सहाय्यक वन्यजीव रक्षक |
| ५ | ५०(१) (३) | प्रवेश करण्याची, झडती घेण्याची व स्थानबध्द करण्याची शक्ती | अतिरिक्त मुख्य वन्यजीव रक्षक/ उपमुख्य वन्यजीव रक्षक/ वन्यजीव रक्षक सहाय्यक वन्यजीव रक्षक |
| ६ | ५४ | गुन्हे आपसात मिटवण्याचे अधिकार (मर्यादनूसार) | अतिरिक्त मुख्य वन्यजीव रक्षक / उपमुख्य वन्यजीव रक्षक |
| ७ | ५५ | न्यायालयात तक्रार दाखल करण्याचे अधिकार | अतिरिक्त मुख्य वन्यजीव रक्षक / उपमुख्य वन्यजीव रक्षक/ वन्यजीव रक्षक / सहाय्यक वन्यजीव रक्षक / मानद वन्यजीव रक्षक |

उपवनसंरक्षक यांनी वनरक्षक / वनपाल / वनपरिक्षेत्राधिका-यांचे कामाबाबत नियमित आढावा घ्यावा व वन्यजीव संबंधी अभिलेख तपासावे.

१.५) वन्यप्राणी वनक्षेत्राच्या बाहेर ग्रामपरिसरात सुध्दा जातात व त्यांचा संबंध ग्रामस्थासोबत येतो. त्याचप्रमाणे वनक्षेत्राजवळील ग्रामस्थांमध्ये वन्यप्राण्याबाबत भितीमिश्रीत कुतूहल असते त्यामूळे या ग्रामस्थांना माहितीपत्रके, चित्रफिती व प्रत्यक्ष संभाचे आयोजन करून वन्यप्राण्यांबाबत माहिती देणे आवश्यक आहे.स्थानिकाच्या मनात वन्यप्राण्यांबाबत आस्था निर्माण करून ते त्यांच्या प्रगतितील अडचण नसून वन्यप्राण्यांच्या अस्तित्वामुळे पर्यावरणाचा समतोल राखला जावून ग्रामस्थांना फायदाच होईल, या बाबत त्यांना अवगत करण्यात यावे. **अशा प्रकारच्या सभामध्ये शालेय विद्यार्थ्यांना केंद्रबिंदू मानण्यात यावे.** साधारणतः वन्यजीव क्षेत्रात ग्रामस्थ तसेच स्थानीक कर्मचारी / अधिकारी यांचे साठी नियमित अभ्यास दौरे / शिबीर / प्रबोधन कार्यशाळा आयोजीत केल्या जातात. मात्र प्रादेशिक वनक्षेत्रात वन्यजीव संबंधी असे कार्यक्रम कमी प्रमाणात घेतले जातात. म्हणून उपवनसंरक्षक (प्रादेशिक) वनसंरक्षक (प्रादेशिक) यांनी जातीने लक्ष घालून अशा कार्यक्रमाचे आयोजनात वाढ करून वर्षभरात कमीत कमी २ प्रबोधन कार्यशाळा ग्रामस्थ, वनसंरक्षक समिती तसेच वनरक्षक आणि वनपालांसाठी प्रत्येक परिक्षेत्रात. आयोजीत कराव्या. यासाठी वन्यजीव शाखेचे सहकार्य घेण्यात यावे व त्यांनी वार्षिक आराखडयात व अर्थसंकल्पात हया

**१.६)** प्रादेशिक वनक्षेत्रामध्ये दिवसेंदिवस कमी होत असलेल्या वन्यजीवांची संख्या लक्षात घेवून उपवनसंरक्षक / वनसंरक्षक (प्रादेशिक) यांनी वन्यप्राण्यांच्या विशेषतः वाघ, बिबट, अस्वल, रानकुत्रे व इतर अनुसूची १ तसेच इतर धोकाग्रस्त (endangered) प्रजातींचे आश्रयस्थळ / प्रजनन क्षेत्र इत्यादीचा शाध लावून अशा क्षेत्राला वन्यजीवांचे दृष्टीने संवेदनशिल घोषीत करावे व या क्षेत्रात विशेष उपाययोजना करून वार्षिक आराखडा तयार करावा आणि अर्थसंकल्पात त्याचा समावेश करून योग्य अंमलबजावणी करण्याची दक्षता घ्यावी. या उपाययोजनेत विशेषतः खालील ३ बाबींचा समावेश असावा.

१) संवेदनशिल क्षेत्रात आढळणा-या वन्यप्राण्यांची सध्याची संख्या व स्थिती (Status) काय आहे वा ते

स्थानिक किंवा राज्यस्तरावर नष्टप्राय होण्याच्या स्थितीत आहे किंवा कसे याबाबतचा अहवाल विभागीय स्तरावर तयार करावा.

२) या क्षेत्रात वन्यप्राण्यांचे आश्रयस्थळ / प्रजनन क्षेत्र / वावर क्षेत्र इ. ची माहिती गोळा करून परिक्षेत्रवार नकाशात दाखवुन त्यांच्या अस्तित्वासंबंधी संभाव्य धोका (perceptible threats)

ओळखुन त्यासंबंधी उपाययोजना करावी.

३) पाणी व चारा उपलब्धतेबाबत माहिती गोळा करून पाणी, चारा वा आश्रयस्थळ संबंधी अपायकारक बाबींवर (limiting factors) मात करण्यासाठी उपाययोजना करावी.

यासंबंधी कृती आराखडा विभागीय स्तरावर तयार करून त्याच्या योग्य अंमलबजावणी बाबतचा आढावा वनसंरक्षक स्तरावरून घेण्यात यावा असे केल्यास, संरक्षित क्षेत्राबाहेरही वन्यप्राण्यांचया संख्येत हळूहळू निरंतर होत असलेली घट थांबेल व त्यांचे संवर्धन, प्रजनन व संरक्षण होवून त्या भागात संरक्षित क्षेत्राप्रमाणे वन्यप्राण्यांची व पर्यायाने वाघांची संख्या स्थिर होईल.

१.७) मदारी वन्यप्राण्यांचा खेळ करून आपली उपजिविका करीत असतात. ते प्रामुख्याने अस्वल, माकड,साप व मुंगूस इत्यादी प्राण्यांचा खेळ दाखवितात परंतू अशा प्राण्यांना प्रशिक्षण देतेवेळी त्यांचेवर अत्याचार केले जातात. त्यामूळे केंद्र शासनाचे निर्देशानूसार सिंह,वाघ,बिबट,अस्वल व माकड या वन्यप्राण्यांच्या खेळ प्रदर्शनावर बंदी घालण्यात आली आहे हे लक्षात घेवून नियतानुसार कारवाई करण्यात यावी.

१.८) काही वन्यप्राणी जसे,हरीण,मूंगूस,ससा,पक्षी, साप व अपवादात्मक परिस्थीतीमध्ये काही मासांहारी वन्यप्राणी जसे बिबट व वाघ बिना परवानगीने पाळले जातात. अशा प्रकारे वन्यप्राणी पाळल्यास त्यांचेवर गुन्हा नोंदविण्यात यावा. वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ अंतर्गत सर्व वन्यप्राण्यांच्या शिकारीवर बंदी घालण्यात आली असून तसे करणे **कायद्यान्वये दखलपात्र गुन्हा आहे. ही माहिती सर्वाना अवगत करण्यात यावी.**

## २.०० <u>वन्यप्राण्यांच्या हालचालींचा मागोवा:-</u>

वनक्षेत्रामध्ये अथवा बाहेर सुध्दा वन्यप्राण्यांचा संचार असतो. स्थानिक कर्मचा-यांनी आपल्या क्षेत्रातील वन्यप्राण्यांचा मुख्यत्वे करून वाघ,बिबट या प्राण्यांचा मागोवा घ्यावा.

विशेषत: पावसाळयात आणि उन्हाळयात वन्यजीव वनक्षेत्राबाहेर भटकतात व याचवेळी त्यांची शिकारही होते असे आढळून आले आहे. या कालावधीत वनकर्मचा-यांनी वन्यप्राण्यांच्या हालचालींचा मागोवा ठेवावा व या क्षेत्रात गुन्हेगारांकडून दुष्कृत्य होणार नाही, याची दक्षता बाळगावी, तसेच अशा

प्रकारच्या माहितीचा दूरूपयोग गुन्हेगारांकडून होणार नाही याची दक्षता बाळगण्याची सुध्दा आवश्यकता आहे.

३.०० **स्थानिक वनसंरक्षण समित्यांची मदत:-**

वनविभाग व वन्यजीव विभागामार्फत अनेक वनसंरक्षण समित्या स्थापित करण्यात आल्या असून, त्यांचे समन्वयाने वन्यजीवांच्या संरक्षणाबाबत मोठी कामगीरी बजावता येऊ शकेल. राष्ट्रीय उद्याने व अभयारण्ये यांच्या हद्दीच्या बाहेर ही वनक्षेत्रात मोठया प्रमाणावर वन्यप्राणी आढळतात व बरेच वेळी ते अभयारण्य क्षेत्रातून बाहेरही भटकतात. अशा क्षेत्रातील वनकर्मचा-यांनी स्थानिक समित्यांच्या समन्वयातून माहिती गोळा करून वन्यप्राण्यांना आवश्यक संरक्षण पुरावावे. याबाबत वन संरक्षण समितीच्या कार्यसुचीमध्ये जरुर तो उल्लेख करण्यात यावा.

३.०१ वन्यप्राणी संरक्षण समिती-

अभयारण्ये व राष्ट्रीय उद्याने यांच्या सभोवतालच्या वनक्षेत्रामध्ये अनेक प्रकारचे वन्यप्राणी आढळून येतात. त्यांचे संरक्षण करण्यासाठी लगतच्या ज्या गावांमध्ये संयुक्त वन व्यवस्थापनांतर्गत स्थापना करण्यात आलेल्या समितीमध्ये **वन्यप्राणी संरक्षण उपसमितीची** निर्मीती करण्यात यावी. अशा प्रकारच्या समित्या महाराष्ट्र राज्यातील ३००० गावांमध्ये स्थापन करण्याचे उद्दिष्ट देण्यात येत आहे.वन्यजीव संरक्षणव संवर्धन हे या उपसमितीचे मूळ उद्देश राहील. केंद्र शासनाची परिस्थितीकी विकास योजना अंतर्गत अश्या विकास कामासाठी योग्य प्रस्तावामार्फम अनुदानही उपलब्ध होवू शकेल.

४.०० वन्यप्राण्यांचा अवैध व्यापार:-

वन्यजीवांच्या न्यायप्रविष्ठ प्रकरणांच्या सभोवतालच्या वनक्षेत्रामध्ये अनेक प्रकारचे वन्यप्राणी आढळून आले की, वन्यप्राण्यांनी गुन्हाविषय बरीच प्रकरणे घडतात व न्यायप्रविष्ठ सुध्दा करण्यात येतात. परंतू न्यायालयात त्यांचा सतत पाठपूरावा करण्यात

येत नाही. त्यामूळे काही कालावधीनंतर आरोपी निर्दोष मुक्त होतात. या दृष्टीकोनातून सतत पाठपूरावा करण्यात यावा. तसेच प्रत्येक विभागाने आरोपींची व संशयीत इसमांची यादी तयार करून ठेवावी. सराईत गुन्हेगारांची यादी छायाचित्रासह प्रत्येक परिक्षेत्र कार्यालयामध्ये ठेवण्यात यावी.

४.०१ सांबर व चितळांच्या भारशिंगाचा व्यापार सन १९९८ पर्यत सूरू होता. याद्वारे परदेशात सुध्दा मोठया प्रमाणात निर्मात करण्यात येत होती परंतू नंतर दिनांक ४.८.१९९८ च्या भरत सरकारच्या वाणिज्य विभागाच्या अधिसुचने नुसार भारशिंगाच्या आयात निर्यातीवर सुध्दा बंदी करण्यात आली आहे. तथापी मोर पिसांच्या व्यापारावर देशांतर्गत कोणतेही निर्बंध नाहीत. याबाबत

वनसंरक्षक, उपवनसंरक्षक, वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी योग्य अंमलबजावनीची खात्री करावी. हया सुचनांची दखल घेवून जरूरती कार्यवाही व्हावी.

२.०० **वन्यजीव-मानव आमना-सामना:-**

वन्यप्राण्यांचे संरक्षण करून पर्यावरणाचा समतोल सांभाळणे अत्यंत आश्यक आहे. वननितीप्रमाणे ३३ टक्के भाग वनाच्छादित असावा व त्यातील जैविक विविधता सर्वकषपणे चिरकालीन स्वरूपात

राहणेसाठी संरक्षित क्षेत्राचे जाळे असावे. दिवसेंदिवस कमी होत असलेले वनाच्छादितक्षेत्र व लोकांच्या वाढत्या गरजा यांचा ताळमेळ जुळत नाही. त्यातूनच वन्यप्राणी व स्थानिक लोकांमध्ये परस्परात चढाओढ होत असल्याचे आढळते. वन्यप्राण्यांना संरक्षित क्षेत्रात संरक्षण मिळत असल्याने त्यांच्या संख्येत वाढ होत आहे. अनावधाने वा जाणीवपूर्वक वन्यप्राणी खाजगी क्षेत्रात प्रवेश करतात. वन्यजीवापासून मिळणारे फायदे व तोटयाची एकत्रीतपणे विचार न होता गैरसमजुतीपोटी काही वेळा केवळ नूकसान झाल्याचीच ओरड होते. या संदर्भात शेतक-यांकडून निवेदने प्राप्त झ ाल्याने शासनस्तरावरून मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली सचिवस्तरीय समितीची स्थापना करण्यात आली व त्यामध्ये प्रामुख्याने खालील ३ निर्णय घेण्यात आले.

१) पिक नुकसानी बाबत पिंकाचा विमा करणे.

२) पिंकाच्या संरक्षणासाठी शेत व जंगल यामध्ये दगडी पाळ बांधणे.

३) अत्यंत आवश्यक असल्यास रानडुकरांची पारध करावी.

वरील निर्णयांपैकी, पिक नुकसानीबाबत विमा हा शासनाच्या विचाराधिन असुन, इतर दोन निर्णय झालेले आहेत. पिकांच्या संरक्षणासाठी दगडीपाळ, रोजगार हमी योजनेअंतर्गत बांधण्यात यावी, यासाठी आवश्यक अंदापत्रके, संबंधित जिल्हाधिकारी यांचेकडुन मंजूर करून घेण्यात यावेत.रानडुक्करांची पारध करणेबाबत या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष- २३(३)/सचिवस्तरीय/२८९९/०१-०२, दिनांक २५/१/२००२ अन्वये विस्तृत सुचना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.

**३.०० <u>मानद वन्यजीव रक्षकांची नियुक्ती व कर्तव्ये-</u>**

वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ मधील कलम ४ (१)(बब) नूसार प्रत्येक जिल्हयासाठी मानद वन्यजीव रक्षकाची नेमणूक करण्यात आली आहे. शासनाचे दिनांक २७ सप्टेंबर २००१ च्या राजपत्रानुसार कलम ५५ चे तरतुदीचे वापर करण्याचे अधिकार मानद वन्यजीव रक्षकांना देण्यात आले आहेत. मानद वन्यजीव रक्षकांनी खालील कर्तव्ये करणे अपेक्षित आहे.

१) लोकांमध्ये निर्सग व वन्यजीव संवर्धानाबाबत आस्था व जागृती निर्माण करणे.

२) राज्य वन्यजीव सल्लागार मंडळ किंवा मुख्य वन्यजीव व रक्षक यांनी सुचविलेल्या वन्यजीव संरक्षण विषयक प्रकरणांमध्ये सहभाग घेणे.निर्सग आणि वन्यजीव संवर्धनाबाबत लोकांमध्ये जागृती निर्माण करणे जरूरीचे आहे. भारतीय दंड संहितेच्या कलम २१ अंतर्गत मानद वन्यजीव रक्षक यांना लोकसेवक मानले असून वन्यजीव संरक्षण अधिनियमाच्या कलम ६० प्रमाणे चांगल्या हेतूने केलेल्या कृत्यांबद्दल त्यांना संरक्षण प्रदान केले आहे.

७.०० वनवृत्तस्तरावर नियंत्रण कक्षाची स्थापना:-

महाराष्ट्र शासन, निर्णय दिनांक ७ नोव्हेंबर २००० अन्वये राज्यात व्याघ्र कक्षाची स्थापना करण्यात आली असून, राज्यस्तरावर अतिरिक्त पोलीस महानिर्देशक (मुख्यालय), यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. त्यांचे मार्फत

वन्यप्राण्यांच्या अवयावांची अवैध तस्करी व व्यापार इत्यादि रोखण्यासाठी पोलीस, वन व इतर विभागांमध्ये समन्वय ठेवण्यात येतो.

अशा प्रकारे महसूल विभागस्तरावर सुध्दा क्षेत्रिय पोलीस महानिरिक्षक यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. अवैध गुन्हे रोखण्यासाठी तसेच गुन्हयांचा, आरोपींचा शोध व तत्सम पुढील कार्यवाहीसाठी सुध्दा या समितीचा पुरेपूर उपयोग करण्यात यावा.

याच धर्तीवर मुख्य वनसंरक्षक, वनसंरक्षक (प्रादेशिक) यांनी आपआपल्या **वनवृत्तस्तरावर विभागीय वन अधिकारी (दक्षता) यांचे अध्यक्षतेखाली व विभागीयस्तरावर वनक्षेत्रपाल फिरतेपथक यांचे अधिपत्याखाली वन्यजीव विषयक शोध व सनियंत्रण कक्ष स्थापित करण्यात यावे.** असे कक्ष तातडीने निर्माण करून या कार्यलयास कळवावे. या कक्षांचा आढावा दर महिन्याला अनुक्रमे संबंधित मुख्य वनसंरक्षक, वनसंरक्षक व उपवनसंरक्षक यांनी घ्यावा. तसेच हा कक्ष वर उल्लेख केलेल्या महसुल विभागस्तरीय समितीच्या संपर्कात राहतील, असे निर्देश देण्यात येत आहेत. विभागीय वनअधिकारी (दक्षता) यांचे कामाचा आढावा घेत असतांना मुख्य वनसंरक्षक (संरक्षण) महाराष्ट्र राज्य, मुख्य वनसंरक्षक / वनसंरक्षक (प्रादेशिक) यांनी शोध वा नियंत्रण कक्षाच्या कामाचाही आढावा घ्यावा.

८.०० <u>इतर महत्वाच्या सूचना:-</u>

८.०१ शिकारीमध्ये किंवा अपघातामध्ये वन्यप्राणी मृत झाल्यास पंचनामा करून अवयवांसह विल्हेवाट लावण्यात यावी व न्यायप्रविष्ट प्रकरणाव्यतिरिक्त इतर प्रकरणांमध्ये मृत शवाचा कुठलाही अवयव जतन करण्यात येवू नये. वाघ व बिबट या प्राण्यांचे संपूर्ण मृत शव जाळून नष्ट करण्यात यावे.

८.०२ वन्यप्राण्यांच्या मृत्यूबाबत प्राथमिक माहिती संबंधीत वनक्षेत्रपाल यांनी घटना कळल्यानंतर संबंधीत उपवनसंरक्षकाना १२ तासांचे आत द्यावी. संबंधीत उपवनसंरक्षक यांनी घटना घडल्याच्या २४ तासाचे आंत मुख्य वनसंरक्षक, वनसंरक्षक आणि प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांना माहिती द्यावी व घटना स्थळालाही २४ तासाच्या आत भेट द्यावी. या संदर्भात तत्कालीन मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव)

महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष -२३(ब)/०७/००-०१ दि. ३/४/२००१ अन्वये सूचना तत्कालीन वनसंरक्षक (सर्व) व उपवनसंरक्षक (सर्व) यांना देण्यात आलेल्या आहेत. वन्यप्राण्यांच्या गुन्हयांच्या संदर्भात चौकशी प्राधान्याने व लवकरात लवकर करण्याची आवश्यकता आहे.

८.०३ प्राथमिक अहवालानंतर एका आठवडयाच्या आंत द्यावयाच्या सविस्तर अहवालामध्ये सोबत जोडलेल्या प्रपत्रातील माहितीचा अंतर्भाव करावा. **(परिशिष्ट-४)** सदर अहवाल उपवनसंरखक यांनी संबंधीत मुख्य वनसंरक्षक, वनसंरक्षक व प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांना शिघ्र टपालाने पाठवावा. उपरोक्त नमूद वृत्तस्तरावरील व विभागीय स्तरावरील शोध व नियंत्रण कक्ष स्थापन केल्यानंतर गुन्हयांना प्रतिबंध व नियंत्रण परिणामकारक होतील याकडे सर्व अधिका-यांनी जातीने लक्ष द्यावे. संरक्षित क्षेत्राबाहेरही अश्या प्रकरणावर अधिक लक्ष केंद्रीत करण्याची आवश्यकता असून, मुख्य वनसंरक्षक, वनसंरक्षक (प्रादेशिक), मुख्य वनसंरखक (संरक्षण) यांनी "शोध व नियंत्रण " कक्षाचे कामाबाबत नियमित आढावा घ्यावा व आवश्यकता वाटल्यास तांत्रीक बाबीवर उपवनसंरक्षकांनी मुख्य वनसंरक्षक, वनसंरक्षक (वन्यजीव) / प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांचा सल्ला वा मदत घ्यावी.

८.०४ वन्यप्राण्यांच्या अधिवासाच्या संवर्धन व विकासासाठी पाणस्थळांची निर्मिती, फळझ ाडांची रोपवने, कुरण विकास इत्यादी कामे प्राधान्यान घेण्यात यावी. अधिवास क्षेत्राच्या विकासामुळे तृणभक्षक प्राण्यांची संख्या वाढीस लागुन त्यावर अवलंबून असणा-या मांसभक्षक प्राण्यांच्या संख्येतसूध्दा पर्यायाने वाढ होईल. पाणवठे,वनतळी, वनबंधारे व एनिकटस मधुन उपलब्ध अनुदानातून नियमित गाळ काढुन शक्यतो उन्हाळयात वा टंचाईचे कालावधीत नियमित पाणी उपलब्ध करून द्यावे अशा पाणस्थळाचे अवैध शिकारी व पाळीव जनावरांपासून संरक्षण करणे महत्वाचे आहे.

८.०५ वन्यप्राण्यांचे संवर्धन व विकासासाठी वनक्षेत्राची सलगता असणे आवश्यक आहे. जेणेकरून वन्यप्राण्यांनी पुढील प्रजाती आपसातील संकर (Inbreeding) टाळून अनुवंशिकदृष्टया सक्षम निर्माण होतील. सद्य:स्थितीमध्ये वनक्षेत्रे ही विभागलेली आहेत व एक दुस-याचा संबंध शेती किंवा पडीत / उजाड जमिनीद्वारे आहे. अशा क्षेत्राजवळ

राहणा-या स्थानिक ग्रामस्थांचे प्रबोधन करून वन्यप्राणी भ्रमण क्षेत्रातील अडथळे दुर करणे जरुरीचे आहे. यामध्ये प्रामुख्याने जे पाठवने वन्यजीव वापरतात त्यांची नियमीत देखरेख करणे व पाळीव जनावरे त्या पाणवठयावर येणार नाही याची खात्री करणे, पाळीव जनावरांसाठी गावालगत पाण्याची सोय उपलब्ध अनुदानातून करणे व संक्रमक रोग थांबवण्यासाठी नियमीत लस टोचण्याचे कार्यक्रम घेण्यासंबंधी बाबींचा समावेश असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे अशा क्षेत्रात स्थानिक ग्रामस्थांचा हस्तक्षेप जास्त प्रमाणात राहणार नाही यासाठी संबंधित वनधिका-यांनी, यांचे महत्व सभा / संमेलनाद्वारे ग्रामस्थांना पटवून दयावे.

८.०६ वन्यप्राणी व स्थानिक ग्रामस्थ यांच्यातील सहजीवन सुखदउ करण्यासाठी पोलीस पाटील, ग्रामसेवक, ग्रामपंचायतीचे पदाधिकारी व अशासकीय संस्था इत्यादींचे सहकार्य घेण्यात यावे. त्यांच्यामध्ये वन्यप्राण्यांबाबत आस्था निर्माण करून त्यांचा संरक्षणाच्या कामात उपयोग करून घ्यावा.

८.०७ वनालगत असणा-या काही गावातील गांवकरी वनामधील नदी, नाले आणि वनतलावामधून पाणी दैनंदिन उपयोगासाठी आणतात. यामूळे वन्यजीव व गावकरी यांचे हितसंबंध बिघडतात स्थानीक अधिका-यांनी ही बाब जिल्हा प्रशासनाच्या नजरेस आणुन पर्यायी व्यवस्था करण्याबाबत कळवावे व पाठपुरावा करावा.

८.०८ वाघ, बिबट, काळविट इत्यादी अनुसूची १ मधील वन्यप्राण्यांच्या मृत्यूबाबत प्रकरणांमध्ये उपवनसंरक्षकांनी २४ तासाच्या आत मध्ये घटनेच्या स्थळास भेट द्यावी.

९.० वन विभाग, सामाजिक वनीकरण विभाग व वन विकास महामंडळ मध्ये कार्यरत असलेल्या वेगवेगळया स्तरावरील वन अधिकारी / कर्मचारी हे त्यांचे क्षेत्राबाबत वरील प्रमाणे संपूर्ण माहिती गोळा करून वरिष्ठ अधिका-यांना नियमित सादर करतील आणि वरील प्रमाणे दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी काटेकोरपणे त्यांचे क्षेत्रामध्ये करतील. सर्व अधिकारी / कर्मचारी जेव्हा निरिक्षणासाठी जातात तेव्हा त्यांनी वन्यप्राण्यांचे संवर्धन आणि संरक्षणासाठी आढावा घेऊन त्यावर त्वरीत उपाययोजना करावी. प्रत्येक अधिकारी आणि कर्मचारी यांना आपले स्वयंमुल्यमापन अहवालात वन्यजीव संरक्षण व संवर्धनाबाबत काम केल्याचा उल्लेख करणे उचित ठरेल.

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव)
महाराष्ट्र राज्य, नागपूर

परिशिष्ट -१

## महाराष्ट्र राज्यातील राष्ट्रीय उद्याने व अभयारण्ये

### राष्ट्रीय उद्याने

| अ.क्र. | राष्ट्रीय उद्यान | जिल्हा |
|---|---|---|
| १ | ताडोबा राष्ट्रीय उद्यान | चंद्रपूर |
| २ | नवेगांव राष्ट्रीय उद्यान | गोंदिया |
| ३ | पेंच राष्ट्रीय उद्यान | नागपूर |
| ४ | गुगामल राष्ट्रीय उद्यान | अमरावती |
| ५ | संजय गांधी राष्ट्रीय उद्यान | मुंबई |

### अभयारण्ये

| अ.क्र. | अभयारण्य | जिल्हा |
|---|---|---|
| १ | अंधारी अभयारण्य | चंद्रपूर |
| २ | बोर अभयारण्य | वर्धा |
| ३ | टिपेश्वर अभयारण्य | यवतमाळ |
| ४ | नागझिरा अभयारण्य | भंडारा |
| ५ | भामरागड अभयारण्य | गडचिरोली |
| ६ | चपराळा अभयारण्य | गडचिरीली |
| ७ | मेळघाट अभयारण्य | अमरावती |
| ८ | नरनाळा अभयारण्य | अकोला |
| ९ | वाण अभयारण्य | अमरावती |
| १० | अंबाबरवा अभयारण्य | बुलढाणा |
| ११ | नांदूर मधमेश्वर अभयारण्य | नाशिक |
| १२ | यावल अभयारण्य | जळगांव |
| १३ | कळसूबाई हरिश्चंद्रगड अभयारण्य | अहमदनगर |
| १४ | गौताळा औट्रमघाट अभयारण्य | औरंगाबाद, जळगांव |
| १५ | जायकवाडी पक्षी अभयारण्य | औरंगाबाद, अहमदनगर |
| १६ | नायगांव मयूर अभयारण्य | बीड |
| १७ | येडशी-रामलींगघाट अभयारण्य | उस्मानाबाद |
| १८ | अनेरडॅम अभयारण्य | धुळे |
| १९ | काटेपूर्णा अभयारण्य | अकोला, वाशिम |

| | | |
|---|---|---|
| २० | पैनगंगा अभयारण्य | यवतमाळ |
| २१ | ज्ञानगंगा अभयारण्य | बुलढाणा |
| २२ | कांरजा- सोहळा | अकोला |
| २३ | लोणार अभयारण्य | बुलढाणा |
| २४ | कर्नाळा पक्षी अभयारण्य | ठाणे |
| २५ | तानसा अभयारण्य | ठाणे |
| २६ | फनसाड अभयारण्य | रायगड |
| २७ | भिमाशंकर अभयारण्य | पुणे |
| २८ | माळढोक पक्षी अभयारण्य | पुणे, सोलापूर, अहमदनगर |
| २९ | रेहेकूरी अभयारण्य | अहमदनगर |
| ३० | मयूरेश्वर - सूपे अभयारण्य | पुणे |
| ३१ | राधानगरी अभयारण्य | कोल्हापूर |
| ३२ | सागरेश्वर अभयारण्य | सांगली |
| ३३ | कोयना अभयारण्य | सातारा |
| ३४ | चांदोली अभयारण्य | सातारा, सांगली, कोल्हापूर, रत्नागिरी |
| ३५ | मालवण सागरी अभयारण्य | सिंधुदूर्ग |

**वरील सुरक्षित क्षेत्रांमध्ये खालील तीन व्याघ्र प्रकल्पांचा समावेश आहे.**

| अ.क्र. | व्याघ्र प्रकल्प | जिल्हा |
|---|---|---|
| १ | मेळघाट व्याघ्र प्रकल्प | अमरावती |
| २ | ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प | चंद्रपूर |
| ३ | पेंच व्याघ्र प्रकल्प | नागपूर |

परिशिष्ट-२

## शिकार प्रतिबंधक उपाययोजनांचा आढावा
## दिनांक १२/४/२००१ च्या बैठकीचा वृतांत

सदर बैठक दिनांक १२/४/२००१ रोजी वनभवन नागपूर येथे आयोजित करण्यात आली. बैठकीतील उपस्थितांची नावे परिशिष्टात दिलेली आहेत. प्रधान मुख्य वनसंरक्षक या बैठकीस संबोधित करणार होते. तथापि काही अनिवार्य कारणांमूळे ते उपस्थित राहू शकले नाही.

**प्रस्तावना :-** मुख्य वनसंरखक (वन्यजीव) यांनी अलिकडील वन्यप्राणी हत्येचया घटनांचा उल्लेख करून खलील उद्देशाने ही बैठक बोलविण्यात आली असल्याचे स्पष्ट केले.

१) शिकारीच्या घटनांचे गांर्भिय जाणने.

२) अशा घटनांना पायबंद घालनेसाठी आपली तयारी कितपत आहे याचा आढावा घेणे.

३) क्षेत्रिय अधिकारी / कर्मचा-यांना भेडसावणा-या समस्यांवर चर्चा करणे.

४) वाईल्डलाईफ प्रोटेक्शन सोसायटी ऑफ इंडिया या संस्थेचया अहवाहलावर चर्चा करणे.

५) वन्यप्राणी प्रगणना.

मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांनी या संदर्भात बैठकीसमोर खालील मुद्दे मांडले.

अ) वन्यप्राण्यांच्या शिकारीच्या बहुतेक घटना राष्ट्रीय उद्याने / अभयारण्ये यांचे बाहेरील क्षेत्रात होतात.

ब) राष्ट्रीय उद्याने / अभयारण्ये यांच्या काठावरील म्हणजेच बफर क्षेत्राकडे अधिक लक्ष देण्याची गरज आहे.

क) उपरोक्त बाहेरील क्षेत्र प्रादेशिक वनविभागांकडे असल्याने तेथील संरक्षणाची जबाबदारी प्रादेशिक विभाग / वृत्तांची आहे.

ड) तात्काळ कार्यवाहीच्या बाबी खालील प्रमाणे आहेत.

१. वन्यप्राण्यांना आढळ, पशुहानी, शस्त्रधारी व्यक्ति, शिकारी तथा वन्यजीव वस्तूंचे व्यापारी यांची माहिती ठेवणे.

२. वाईल्डलाईफ प्रोदेक्शन सोसायटी ऑफ इंडिया या संस्थेने तयार केलेल्या अहवालातील अल्पकालीन कार्यवाहीची योजना.

३. पाणवठयांवरील दक्षता.

४. वन्यप्राण्यांसाठी पाण्याची पुरेशी उपलब्धता.

५. राष्ट्रीय उद्यान / अभयारण्य सीमेपासून ३ कि. मी. चया आत तेंदूपाने संग्रहणावर नियंत्रण.

६. स्थानिक पातळीवर खब-यांचे जाळे उभारणे.

७. वनखेत्रपाल, सहाय्यक वनसंरक्षक, उपवनसंरक्षक आणि वनसंरक्षक यांची वैयक्तिक आस्था

८. प्रशिक्षण.

९. नियंत्रणाची दिशा बिटपातळीपासून वरीष्ठ स्तराकडे असावी.

१०. प्रादेशिक आणि वन्यजीव शाखेतील कर्मचारी / अधिकारी यांच्यात प्रत्येक पातळीवर समन्वय.

विषय :- पाणवठयांवरील वन्यजीव व्यवस्थापन- सादरकर्ते डॉ. खोलकुटे, पशुवैद्यकिय अधिकारी. डॉ. खोलकुटे यांनी प्रामुख्याने विषबाधीत पाणवठे कसे ओळखता येतील याबद्दल माहिती दिली. तीव्र युरियामिश्रीत पाण्याचा प्रभाव प्राण्यांवर १५ ते २० मिनीटात दिसू लागतो. पीएच पेपर च्या सहाय्याने पाण्याची अल्कता अगर आम्लता ओळखणे शक्य आहे. अन्य रासायनिक विषारी द्रव्ये पाण्यावरील तेलकट तवंगावरून आणि तीव्र वासावरून ओळखता येतात अशी त्यांनी माहिती दिली. या संदर्भात त्यांनी खालील सूचना मांडल्या.

१) कृत्रीम पाणवठयात पाणी भरतेवेळी पाण्याची पीएच व्हॅल्यू तपासावी.

२) पाणवठयावर एखादा मोठा प्राणी मेलेला आढळला असल्यास इतरत्र लहान प्राणी, विशेषतः पक्षी, मरण्याची शक्यता असल्याने त्यासाठी शोध घ्यावा.

३) तपासणीसाठी नमूने पाठवितांना शिजलले मांस पाठवू नये.

४) विषबाधेचया प्रकरणातील नमुने फॉरमॅलीनचया द्रावणात मूळीच पाठवू नये. त्याऐवजी मिठात तीव्र द्रावण वापरावे.

५) पचसंस्थेचया अवयवाच्या नमुन्यासाठी एक आणि अन्य अवयवांसाठी दुसरी अशा दोन बाटल्या नमुन्यासाठी वापराव्या.

६) बाटल्यावरील सिल आणि ओळखचिंन्ह स्पष्ट असावे. या चिन्हाची नोंद नमुन्यासोबतच्या पत्रात न चुकता करावी.

प्राण्याचे पोस्ट मार्टेम करतांना करतांना कोणत्या बाबी महत्वाच्या आणि निर्णायक आहेत याचीही माहिती डॉ. खोलकुटे, यांनी बैठकिसमोर सादर केली.

**चर्चा :-** वन्यप्राण्यांचे अवयव आणि व्हिसेरा यांचे परिक्षण करून निर्णय देणारी वनविभागाची स्वतं९ यंत्रणा आवश्यक आहे किंवा कसे या मुद्यांवर दिर्घ चर्चा झ ाली. राज्यातील न्याय वैज्ञानिक प्रयोगशाळा नमुने घेण्यास टाळाटाळ करतात. निष्कर्ष कळविण्यास अत्यंत विलंब लावतात अशा तक्रारी काही उपस्थितांनी मांडल्या. कातडे आणि हाडे यावरून प्राण्यांची ओळख करण्यास भारतीय प्राणी सर्वेक्षण विभागास मान्यता देण्यात आली आहे तथा व्हिसेरा टेस्टचे काम मॉलेक्युलर बॉयोलॉजी संस्था, हैद्राबाद येथे करण्यात येते अशीही माहिती बैठकीस देण्यात आली. हैद्राबादची संस्था या कामासाठी प्रकरणानुसार शुल्क आकारते आणि वशेषत: घटनेनंतर ब-याच उशिरा लक्षात आलेल्या प्रकरणात तेथील तपासणी महत्वाची ठरते. विषबाधेच्या प्रकरणात प्राण्याच्या मृत्यू प्रकरणात शारीरीक खुणा उपलब्ध नसताना त्यामुळे मृत्यूचे कारण प्रमाणित करणे शक्य होत नाही असे बैठकीच्या निदर्शनास आणण्यात आले. याबाबत ठरले की, वीजप्रवाहामूळे ज्याप्रमाणे मानवी मेंदूच्या पेशी आकंचित पावतात त्याप्रमाणे वन्यप्राण्यांचे बाबतीतही होते किंवा कसे याची पडताळणी व्हावी. डॉ. खोलकुटे, यांनी तयार केलेली वन्यप्राणी मार्गदर्शक पुस्तिका सर्व उपस्थितांना देण्यात आली.

**विषय:- राष्ट्रीय उद्याने/ अभयारण्ये याबाहेरील वन्यजीव संरक्षणची उपाययोजना**

- सादरकर्ते श्री. भगवान, वनसंरक्षक (वन्यजीव) नागपूर

राष्ट्रीय उद्याने / अभयारण्ये याबाहेरील क्षेत्रात होणा-या शिकारीच्या घटनांची कारणमिमांसा खालील प्रमाणे आहे.

१. प्रादेशिक विभागाकडील अन्य समस्यांना (उदा. वृक्षतोड, आग, इत्यादी.) प्राधान्य मिळत असल्याने वन्यजीव विषयक प्रश्नांबाबत संवेदना प्रबळ नसते.

२. प्रादेशिक क्षेत्रात वन्यप्राण्यांच्या हालचालींच्या अभ्यासाकरिता पुरेसे मनुष्यबळ व साधनसामुग्री नसते. या संदर्भात पुढील मुद्दे मांडण्यांत आले.

अ) गुप्त माहिती गोळा करणे:- हा विषय अत्यंत महत्त्वाचा असून त्यास पर्याय नाही. शिकारीच्या कामात स्थानिक लोकच मदत करीत असल्याने स्थानिक

पातळीवर गुप्तहेर पेरणे अनिवार्य ठरते. गुप्त वार्ता मिळविण्यासाठी जाळे उभारणे हे काम अल्पकाळात साधणारे नाही. संबंधित अधिका-याचे पद, कौशल्य आणि त्याचा कार्यकाळ यावर ते अवलंबून असते या कामासाठी पैशाचीही गरज भासते. पैसा, प्रतिष्ठा याप्रमाणेच पैशाची आकांक्षा हे सुध्दा खबर देण्यामागील कारण असते. पोलिस विभागाप्रमाणेच वनविभागाकडेही यासाठी परेसे अनुदान आवश्यक आहे.

ब) वन्यप्राण्यांचे हालचालीचा मागोवा घेण अत्यंत आवश्यक आहे. तथापि या माहितीचा दुरूपयोग गुन्हेगारांकडून होवू नये याची दक्षताही बाळगावी. राष्ट्रीय उद्याने / अभयारण्ये यामधील वन्यप्राण्यांनी संख्या महत्तम पातळीवर गेल्याने स्पिलआव्हर परिणाम म्हणून वन्यप्राणी लगतच्या बाहेरील क्षेत्रात भटकतात. विशेषत: पावसाळयात वाघ आणि गवे बाहेर भटकतात असा निरिक्षणाचा निष्कर्ष आहे.

**चर्चा :-** चर्चेत उपस्थितांनी मत मांडले की, खुद्द वनमजूर आणि वनरक्षक यांना परिसरातील बारीकसारीक घडामोडीची बरीच माहिती असते, तथापि वरिष्ठ अधिकारी जोपर्यन्त त्यांचेशी विश्वासाचे संबंध प्रस्थापीत करीत नाही तोपर्यन्त ही माहिती त्यांचेपर्यन्तच मर्यादित राहते. वनविभागात चांगल्या कार्याबद्दल बक्षिसे देण्याची पध्दत असूनही त्याचा वापर क्वाचितच होतो. क्षेत्रसंचालक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प यांनी मेळघाट व्याघ्र प्रकल्पात अशी पध्दत सुरू असल्याचे आणि त्याचा चांगला परिणाम दिसत असल्याचे सांगितले पोलिस पाटीलच्या धर्तीवर वनभिागानेही गावांमध्ये पगारी व्यक्तिची नेमणूक करावी अशीही सुचना मांडण्यात आली. ग्रामीण भागात गुराखी व्यक्ती चांगल्या खब-या होवू शकतात, त्यामूळे त्यादृष्टीने त्यांचा उपयोग व्हावा. अधिकारी कर्मचा-यांनी अधिक संवेदनक्षम होणे आणि त्यांनी

प्रामाणिकपणे लबाबदारी पार पाडणे अनिवार्य वनकर्मचा-यांनीही कर्तव्यात प्रयत्नांची पराकाष्ठा करणे आवश्यक आहे. मिळणारी प्रत्ये क खबर सत्य असेलच असे नाही त्यामूळे माहितीचा उपयोग अत्यंत कौशल्याने व्हावा.

**विषय :- वन्यजीव संरक्षाणार्थ प्रादेशिक वनवृत्तांनी केलेल्या उपाययोजना-**

**वनसंरक्षक, अमरावती वृत :-** मेळघाटात विषबाधेची प्रकरणे लक्षात आल्याने जिल्हयात रासायनिक किटकनाशकांच्या विक्रीची माहिती वनविभागाला पुरविण्याबद्दल अन्न व औषधी प्रशासनास विनंती करण्यात आली आहे. क्षेत्रसंचालक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प यांचेशी समन्वय साधण्याच्या दृष्टीने सभा घेण्यात आल्या आहेत आणि यापुढेही घेण्यात येतील.

**चर्चा :-** उपवनसंरक्षक, अमरावती यांनी सांगितले की, सांगितले की, त्यांचे विभागात वन्यप्राण्यांचा शेतीला उपद्रव होत असल्याने लोक सुडभावनेने वन्यप्राण्यांची हत्या करतात. अनुसूची ३ मधिल प्राण्यांना मारण्याचे अधिकार असले तरी, या तरतूदीचा वापर करण्यासाठी पुरेसे मनुष्यबळ आणि यंत्रणा उपलब्ध नाही. मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांनी सूचना केली की, अशा प्रकरणांचे अधिक्य असलेल्या गावांच्या लहान समुहात ही उपाययोजना पडताळून पहावी. त्यानंतर आवश्यकतेनूसार अन्य क्षेत्रातही ही कायवाही करावी. तृणभक्षी

वन्यप्राण्यांच्या संख्येचा अंदाज घेण्याची उत्तम संधी यावर्षीच्या प्रगणनेच्या स्वरपात लाभली असल्याने सर्वांनी प्रगणना कार्य लक्षपूर्वक करावे असे त्यांनी आवाहन केले.

**वनसंरक्षक, उत्तर चंद्रपूर वृत्त :-** स्थानिक वनसंरक्षण समित्यांची मदत घेण्यात येत असून वृत्तातील वेगवेगळे वनविभाग आणि वन्यजीव विभाग समन्वयाने काम करीत आहेत. ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाबाहेर एकूण ५४ वनसंरक्षण समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. वृत्तातील पाणवठयांची माहिती गोळा करण्यात आली आहे आणि तेथे संरक्षण पुरविण्यात येते.

प्रादेशिक विभागांकडे वाहनांची कमतरता असल्याने ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाची मदत घेण्यात येते. ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या उत्तर-पश्चिमेकडे वनक्षेत्र कमी आणि गावे जास्त असल्याने संयुक्त वनव्यवस्थापनेस वाव नाही.

**चर्चा:-** मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांनी स्पष्ट केले की, संयुक्त गस्त करतांना स्थानिक वनसंरक्षक आणि वनपाल यांना सहभागी करून घेणे अनिवार्य

करावे. स्थानिक बाजारात वन्यपक्ष्यांची आणि वन्यप्राण्यांचे मांसाची विक्रि होवू नये यादृष्टीने वनरक्षकांचे नियमीत अहवाल मागवावे. वनरक्षक तथा वनपाल गस्त करतांना बिटाच्या नेमक्या कोणत्या भागात फिरतात याकडेही लक्ष द्यावे. राष्ट्रीय उद्यान / अभयारण्यापासून ३. कि. मी. च्या आत तेंदूपाने संकलन करण्या-यांवर कायदेशिर कार्यवाही करावी.

**वनसंरक्षक, नागपूर वृत्त :-** १) स्थानिक लोक आणि वनकर्मचारी या दोन्ही घटकांना वन्यजीवांप्रती अधिक संवेदनशिल बनविण्यासाठी, त्यांना नियमाची जाणिव करून देण्यासाठी स्थानिक भाषेत पत्रके छापण्यात आली असून बाजाराची ठिकाणे, ग्रामपंचायत, पोलिसपाटील इत्यादी माध्यमातून त्यांचे वाटप करण्यात येते. २) यासोबतच गावक-यांशी तीन प्रकारातून संपर्क साधण्यात येतो- वनसंरक्षण समित्या, लोक संपर्क अभियान आणि लाऊडस्पिकरद्वारे प्रसिध्दी. ३) पाणवठयांची माहिती संकलीत करण्यात आली आहे. ४) वनकर्मचा-यांशी वेगवेगळया स्तरावरुन सतत संपर्क सभा घेण्यात येतात. ५) वांयरलेसवर दररोज सकाळी आणि संध्याकाळी बिट खैरीयत रिपोर्ट घेण्यात येतो. प्रत्येक रात्री वनसंरक्षकांना वृत्ताचा आढावा मिळतो. ६) फिरत्या पथकांना कार्यक्षम ठेवण्यात आले आहे. शस्त्रपरवाने, अवैध श्स्त्रे, जुने शिकरी अवैध व्यवहारात गुंतलेल्या व्यक्ति इत्यादींची माहिती ठेवण्यात येते. ७) वन्यजीव तथा प्रादेशिक उपवनसंरक्षकांशी दोनदा सभा घेण्यात आल्या असून प्रादेशिक उपवनसंरक्षकांनी नागझिरा आणि नवेगांव क्षेत्रांबाबत वन्यजीव तथा वनविकास महामंडळ विभागांच्या अधिका-याशी स्वतंत्रपणे सभा घेऊन सल्लामसलत केली आहे. पेंच बाबतही लवकरच संयुक्त सभा घेण्यात येईल. ८) महत्वाचे मुद्दे असे-शिकार प्रतिबंधक उपाय संयुक्तरित्या व्हावे, अवैध शिकार प्रतिबंधक घटकाविषयी मुलभूत निर्णय व्हावेत आणि, वंन्यप्राणी राष्ट्रीय उद्याने / अभयारण्ये यांच्या सीमेबाहेर का भटकतात याची कारणे शोधावी.

नागपूर वृत्तात करण्यात आलेल्या उपाययोजनांची माहीती देणा-या, वनसंरक्षक यांच्या, २९ मार्च २००१ च्या पत्राची प्रत उपस्थितांना देण्यात आली.

**उपवनसंरक्षक गोंदिया:-** वनसंरक्षक यांनी संयुक्त सभा घेतल्यानंतर प्रादेशिक, वन्यजीव आणि वनविकास महामंडळ यांच्या कर्मचा-यांचीही संयुक्त सभा घेण्यात आली. उपवनसंरक्षक (वन्यजीव) हे समन्वय अधिकारी म्हणून काम करतील असे ठरविण्यात आले. वन्यजीव क्षेत्रातून तेंदूपानाची तोड न करण्याबाबत पत्रके छापून वाटण्यात आली आहेत प्रत्येक आठवडयात सुटीचा एक दिवस ग्रामसंपर्क अभियानासाठी वापरला जातो. सहाय्यक वनसंरक्षक आणि वनक्षेत्रपाल यांना गस्तीची जबाबदारी आखून देण्यात आली असून या गस्तीमध्ये त्यांनी गावक-यांशी चर्चा करून तसेच आपआपसात माहितीची देवाण घेवाण करणे अपेक्षित आहे. संयुक्त वन व्यवस्थापनेंतर्गत पूर्वी केवळ ६ समित्या होत्या. त्यांची संख्या आता ११७ झाली आहे. दररोज बिट खैरीयत रिपोर्ट देण्यात येतो. दररोज. वन्यजीव, प्रादेशिक आणि वनविकास महामंडळाचे उपवनसंरक्षक परस्परांशी संपर्कात असतात.

**चर्चा:-** मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांनी वनसंरक्षक, नागपूर यांच्या प्रयत्नांबद्दल समाधान व्यक्त. केले आणि सूचना केली की अन्य वनसंरक्षक तथा उपवनसंरक्षक यांनी त्यांचे क्षेत्रात असेच प्रयत्न करावेत. तथापि राष्ट्रीय उद्याने / अभयारण्ये येथील वन्यप्राणी भटकण्याच्या मुद्यावर त्यांनी असे मत व्यक्त केले की, याबाबतची वस्तूस्थिती आणि कारणे बारकाईने तपासण्याची गरज आहे.

**विषय :- वन्यजीवांचा अवैध व्यापार-** सादरकर्ते श्री. नितीन देसाई.

वाईल्डलाईफ प्रोटेक्शन सोसायटी ऑफ इंडियाचे श्री. नितीन देसाई. यांनी सर्वप्रथम त्यांच्या संस्थेबद्दल तथा त्यांनी वनविभागासोबत करारनाम्यावर केलेल्या कामाबद्दल माहिती दिली. त्याप्रमाणे त्यांनी केलेल्या नोंदी वन्यजीवांच्या व्यापाराची केंद्रे आणि व्यापारमार्ग, स्थानिक व्यापार, शिकरीच्या पध्दती आणि त्यांच्या शिफारशी याविषयी त्यांनी माहिती दिली. राज्यातील विविध न्यायालयात पडून असलेल्या वन्यजीवविषयक खटल्यांची वस्तुस्थिती त्यांनी संक्षेपात सर्वासमोर मांडली. या संस्थेने वनविभागास सादर केलेल्या अहवालातील शिफारशींपैकी अल्पकालीन कार्य योजना आणि दिर्घकाळ घेणा-या योजना

याबद्दल थोडक्यात माहिती दिली. उपस्थितांना बैठेकित त्याचया प्रती पुरविण्यात आल्या.

**चर्चा:-** उपस्थितांनी संस्थेस सूचविले की, महाराष्ट्र आणिी मध्यप्रदेशातील वन्यजीव प्रगणनेचया आकडेवारीचा वाघ-बिबट शिकारीच्या आकडेवारीसोबत तुलनात्मक अभ्यास करावा, वनविभागाच्या कर्मचा-यांना संवेदनक्षम आणि कुशल बनवितांना कार्यालयीन कर्मचा-यांनाही त्यात सहभागी करावे. नागपूरच्या न्यायिक अधिकारी प्रशिक्षण संस्थेत किंवा नाशिकच्या महाराष्ट्र पोलीस अकादमी येथे कर्मचा-यांसाठी नियमीतरित्या कायदेविषयक प्रशिक्षण घ्यावे. उपवनसंरक्षकांनी त्यांचे विभागातील प्रत्येक प्रकरणाची नियमीतपणे चिकित्सा करावी. न्यायालयातील प्रकरणांचा सतत पाठपुरावा करण्याच्या दृष्टीने प्रत्येक विभागात एक किंवा अधिक कनिष्ठ वकीलाची सेवा, मोबदला देवून, घेण्यात यावी. प्रत्येक विभागाने तथा वृत्ताने आरोपींची आणि संशयीत इसमांची छायाचित्रासह यादी तयार करून ठेवावी. इतर विभागांना ती माहिती घ्यावी. सुंदरबनमध्ये अशी पध्दत सुरू झाली आहे. पोलिस विभागाने शोधलेल्या वन्यप्राणी गुन्हायांची माहिती वनविभागास त्यांनी द्यावी यासाठी प्रयत्न होत असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. तपासकामात पोलिसांची मदत घेण्यात यावी. वनविभागात नविन रक्ताची आवक बंद असल्याने गुन्हेतपासासारख्या कामासाठी उत्साही व धडाडीचे कर्मचारी मिळेनासे झाले आहेत. तथापि जसे मनुष्यबळ उपलब्ध आहे त्यासहच आपले कार्य करावे लागणार आहे. हे बैठकीत स्पष्ट झाले. श्री. नितीन देसाई यांनी सर्व उपस्थितांना आश्वासन दिले की, वन्यजीव गुन्हाच्या तपासकामात तथा न्यायालयीन खटल्यासंबंधाने, विशेषत: अनुसूची -१ मधील प्राण्याबाबत, कोणतीही अडचण आल्यास ते निश्चितच मदत करू शकतील.

**विषय :- वन्यप्राणी प्रगणना-** सादरकर्ते वनसंरक्षक आणि क्षेत्रसंचालक, व्याघ्र प्रकल्प मेळघाट

यावर्षीची प्रगणना राष्ट्रीय स्तरावरील असून ती राज्याच्या सर्व भागात घ्यावयाची आहे. यासाठी एक राज्यस्तरीय समिती स्थापन झाली असून त्या समितीने प्रगणनेचा कार्यक्रम आखलेला आहे. दिनांक ८ एप्रिल आणि ७ मे या दिवशी पाणवठयावरील सर्व प्राण्यांची प्रगणना तर दिनांक १७ ते २३ एप्रिल या कालावधीत पदचिन्हे पध्दतीने वाघ / बिबटयांची प्रगणना करावयाचे ठरले आहे. वनविकास महामंडळाचे क्षेत्रातही ही गणना होईल आणि महामंडळाचे कर्मचारीही त्यात सहभागी होतील. वृत्तस्तरावरील प्रादेशिक समित्यांनी प्रशिक्षण तथा पूर्वतयारी करावयाची आहे. मेळघाट व्याघ्र प्रकल्पाने प्रगणना कामाची माहिती पुस्तिका छापून सर्व वृत्तांना पाठविली आहे. ठरल्याप्रमाणे प्रशिक्षण वर्ग घेण्यात आल्याची माहिती उपस्थितांनी दिली. प्रगणनेसाठी लागणारा खर्च कसा भागवावा हा प्रश्न उपस्थित झाला. काटकसरीचे धोरण ठेवून खर्च वाचवावा त्याचप्रमाणे व्याघ्र प्रकल्पाशेजारील प्रादेशिक विभागांनी याबाबतची आंतरविभागीय देयके वन्यजीव विभागाकडे पाठविण्यास ती स्विकृत करवी असे ठरले.

**समारोपः-** मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांनी सर्वात वन्यजीव व्यवस्थापन तथा वन्यजीव अपराध याबाबत अधिकाधिक सतर्क राण्याचे आवाहन केले आणि बैठकीची सांगता केली.

# परिशिष्ट - ३

# वनाधिकाऱ्यांना दिलेल्या अधिकारांबाबत शासन आदेश.

## Government Gazette Notification Dated 23/9/1993

**By Order and in the name of Governor of Maharashtra,**
**BY THE CHIEF WILDELIFE WARDEN, MAHARASHTRA STATE, NAGPUR**

**ORDER**

No. Desk -22(D)(1)(C) No. 117/1180. In exercise of the powers conferred by sub-section(2) of section 5 of the Wildlife (Protection) Act. 1972 as amended from time to time, I the Chief Wildlife Warden, Maharashtra State, Nagpur with the prior approval of the State Government accorded vide letter No. WLP, 1092/C, No. 533/F-5, Bombay dated June 18, 1993 and in supersession of the power delegated here before vide Notification No.D-7/WLP/ACT/117/798, dated 4th July 1977, hereby delegate to each of the Additional Chief Wildlife Wardens, Deputy Chief Wildlife Wardens, Wildlife Wardens & Assistant Wildlife Wardens appointed for the purpose of this Act vide Revenue of Forests Department, Order No. WLP/1077/86854/F-1, dated 5th May 1977, my powers and duties, under the provisions of the sections of the said Act, as are mentioned in column(2) of the Schedule hr... appended, to the extent specified in column (3) of the Schedule :-

This delegation shall be deemed to have ... me into force on 18th day of August 1993.

**SCHEDULE**

| No<br>(1) | Section of the Act<br>(2) | Extent of Power<br>(3) | To whom delegated<br>(4) |
|---|---|---|---|
| 1. | 11(1)(b) | Power to grant permission to hunt a wild animal other than specified in schedule I which has become dangerous to human life or to property. | Additional Chief Wildlife Wardens, Deputy Chief Wildlife Wardens. |
| 2. | 17-C (1) | Power to receive the application for grant of Licence to cultivate specified plants and to grant renew or refuse the licence therefore. | Additional Chief Wildlife Wardens, Deputy Chief Wildlife Wardens. |

| | | | |
|---|---|---|---|
| 3. | 17D (1) | Power to receive the application for grant of licence to commence or carry on business or occupation as a dealer in a specified plants or part or derivative thereof. | Additional Chief Wildlife Wardens, Deputy Chief Wildlife Wardens. |
| 4. | 17-E (1) | Power to receive the declaration of a stock of specified plants or part or derivative by a cultivator or dealer in such plants. | Additional Chief Wildlife Wardens, Deputy Chief Wildlife Wardens. |
| 4. | 17-H (2) | Power to grant permission to acquire, keep in possession, custody or control or transfer, destroy, damage specified plants deemed to be Government property. | Additional Chief Wildlife Wardens, Deputy Chief Wildlife Warden. |
| 5. | 31, read with 35 (8) | Power to grant permission to enter a sanctuary or national park with any weapon. | Additional Chief Wildlife Wardens, Deputy Chief Wildlife Warden and Wildlife Wardens Incharge of Sanctuary or National Park. |
| 6. | 34(2) read with 35(8) | Power to register the names of the applicants in possession of arms and residing in or within 10 kms. Of a sanctuary or national park. | Additional Chief Wildlife Wardens, Deputy Chief Wildlife Warden, Wildlife Wardens Incharge of Sanctuary or national park. |
| 7. | 39(2) | Power to receive the report of and to take over possession of Government property. | Additional Chief Wildlife Wardens, Deputy Chief Wildlife warden, Wildlife wardens and Assistant Wildlife Wardens. |
| 8. | 39(3) | Power to grant permission to acquire or keep in possession, custody or transfer; destroy or damage etc. wild animals deemed to be Grovernment property. | Additional Chief Wildlife Wardens, Deputy Chief Wildlife wardens. |

| | | | |
|---|---|---|---|
| 9. | 40 (1) | Power to receive the declaration by a person in control custody or possession of any captive animal specified in Schedule I or part II of Schedule II. | Additional Chief Wildlife Wardens, Deputy Chief Wildlife Warden. |
| 10 | 40(2) | Power to grant previous permission in writing to acquire, receive or keep in control, custody or possession, sell offer for sale or otherwise transfer or transport any animal Specified in Schedule 1 or part II of Schedule II or any uncured trophy or meat derived therefrom etc. | Additional Chief Wildlife Wardens, Deputy Chief Wildlife Warden. |
| 11 | 40(4) | Power to receive the declaration by a person who is required to do so, on issue of a notification by the State Government. | Additional Chief Wildlife Wardens, Deputy Chief Wildlife Warden. |
| 12 | 41(1) | Power to enter upon the premises to make enquiries prepare inventories of animal article etc. and to affix identification mark etc. | Additional Chief Wildlife Wardens, Deputy Chief Wildlife Wardens, Wildlife Wardens and Assistant Wildlife Wardens. |
| 13 | 43(1) | Power to grant previous permission in writing to sell, offer for sale, transfer, make animal articles, put under taxidermy etc. in regard to any animal specified in Schedule 1 or Part II of Schedule II to a person not in possession on a certificate of ownership. | Additional Chief Wildlife Wardens, Deputy Chief Wildlife Wardens. |
| 14 | 43(2) | Power to receive the report by a person who transfers or transports from the State in which he resides to another State or acquires any Animal articles trophy or uncured Trophy referred to in section 43(1) in respect of which, he | Additional Chief Wildlife Wardens, Deputy Chief Wildlife Wardens. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | has a certificate of ownership. | |
| 15 | 43(3),(5) | Power to grant permission in writing to transfer or transport from one State to another, acquire by transfer from outside the State, any animal articles or uncured trophy referred to in section 43(1) and issue ownership certificate in case of transfer of ownership. | Additional Chief Wildlife Wardens, Deputy Chief Wildlife Wardens. |
| 16 | 44(2) | Power to receive the declaration of stock of animal articles, trophies, uncured trophies etc. by manufacturer of or dealer in animal Articles, captive animals etc. | Additional Chief Wildlife Wardens, Deputy Chief Wildlife Wardens. |
| 17 | 43(3),(4) and (7) | Power to receive application for and to grant or renew licence to deal in trophies, animal articles, captive animals etc. | Additional Chief Wildlife Wardens, Deputy Chief Wildlife Wardens. |
| 18 | 45 | Power to suspend or cancel a licence granted or renewed under section 44. | Additional Chief Wildlife Wardens, Deputy Chief Wildlife wardens. |
| 19 | 47 | Power to receive the returns of the dealing of licence. | Additional Chief Wildlife Wardens, Deputy Chief Wildlife Wardens. |
| 20 | 49-C(1) and (2) | To receive declaration of stock and take measures specified therefore. | Additional Chief Wildlife Wardens, Deputy Chief Wildlife Wardens. |
| 21 | 49-C(6) | Power to receive report regarding the transfer or transport of schedule animal articles, schedule animals and parts thereof, trophies and uncured trophies derived from schedule animals, captive animals being schedule animals, ivory imported into India or articles made therefrom. | Additional Chief Wildlife Wardens, Deputy Chief Wildlife Wardens. |

| | | | |
|---|---|---|---|
| 22 | 50(1),(3) | Power to enter upon and search any premises, stop and search any vehicles etc. to seize any animal, animal articles/trophy etc. and specified plants and their parts derivatives etc. appearing to be Government property along with any trap, tool vehicle or vessel weapon etc. and to arrest and detain without warrant any person, who has committed to the offence and is not likely to appear and answer any charge and to stop and detain any person for the purpose of producing a licence or permit etc. | Additional Chief Wildlife Wardens, Deputy Chief Wildlife Wardens, Wildlife Wardens and Assistant Wildlife Wardens. |
| 23 | 50(6) | Power to arrange for sale any meat or uncured trophy specified plants or part or derivatives thereof seized under the provisions of Sec.50 | Additional Chief Wildlife Wardens, Deputy Chief Wildlife Wardens. |
| 24 | 54 | Power to compound offences. | Additional Chief Wildlife Wardens, Deputy Chief Wildlife Wardens. |
| 25 | 55 | Power to make complaint to the Court. | Additional Chief Wildlife Wardens, Deputy Chief Wildlife Warden, Wildlife Wardens and Assistant Wildlife Wardens. |

Nagpur,

dated the 18th August 1993

R. N. Indurkar
Chief Wildlife Warden
Maharashtra State,
Nagpur

## परिशिष्ट-४

## वन्यजीव गुन्हयाबाबत माहिती प्रपत्र

| | |
|---|---|
| १. **घटनेची**<br>अ. तारीख<br>ब. स्थळ<br>क. वेळ | |
| २. **घटनेच्या खबरीबद्दलचा तपशिल**<br>अ) खबर कुणी दिली<br>ब) किती वाजता दिली<br>क) कर्मचारी घटनास्थळी केव्हा पोहोचले.<br>ड) गुन्हयाचे ठिकाण | |
| ३. **वनगुन्हा नोंद**<br>अ) प्राथमिक गुन्हा क्र. .व दि.<br>ब) स्थळ<br>क) वेळ<br>ड) गुन्हयात लावलेले कलम | |
| ४. तक्रार करणा-याचे नांव व पत्ता | |
| ५. आरोपीची नांवे. | |
| ६. गुन्हा तपास अधिका-यांचे नांव व हुद्दा. | |
| ७. **आरोपी विरुध्द केलेली कार्यवाही**<br>अ) अटक केल्याचे दिनांक<br>ब) आरोपपत्र पाठविल्याचे दिनांक व न्यायालयाचे नांव व पत्ता | |

| | |
|---|---|
| ८. **आरोपी पोलीस कोठडीत आहेत किंवा न्यायालयीन कोठडीत आहेत.**<br>अ) पोलीस कोठडीत (दिवस)<br>ब) न्यायालयीन कोठडीत (दिवस)<br>क) आरोपी जामिनावर सुटलेत काय व केव्हा पासून.<br>ड) असल्यास जामिन कोणी मंजूर केला. | |
| ९. आरोपीकडून हस्तगत केलेल्या मालमत्तेचा तपशिल | |
| १०. **जप्त केलेल्या मालाची विल्हेवाट**<br>अ) बंध पत्रावर सोडण्यात आलेला माल<br>ब) सध्या ताब्यात असलेला माल | |
| ११. शासकीय कर्मचारी आरोपी असल्यास त्याचे विरुध्द केलेली कार्यवाही | |
| १२. अशा प्रकारची घटना घडू नये म्हणून करण्यात आलेली उपाययोजना | |
| १३. गुन्हयाची सद्यःस्थिती (न्यायालयीन प्रकरणे इत्यादी.) | |